अहवाल क्रमांक : १४४

# पंचायती राज समिती

**(२०१५-२०१६)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या**
**सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात**

# दुसरा अहवाल

(सदर अहवाल दिनांक जुलै, २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०१५

# पंचायती राज समिती

**२०१५-२०१६**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या**
**सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात**

# दुसरा अहवाल

एचबी ११७६—१

## पंचायत राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधाने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. श्री. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.





२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(४) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)
(५) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

## पंचायत राज समिति
## (सन २०१५-२०१६)

**समिति प्रमुख**

१. श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५. श्री. विजयराव खडसे, वि.स.स.
६. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७. श्री. दिलीप माने, वि.स.स.
८. श्री. भारत भालके, वि.स.स.
९. श्री. बाबासाहेब पाटील, वि.स.स.
१०. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
११. डॉ. राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
१२. श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.
१३. श्री. संजय भेगडे, वि.स.स.
१४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
१५. श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
१६. श्री. संजय राठोड, वि.स.स.
१७. श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१८. ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
१९. श्री. प्रकाश भोईर, वि.स.स.
२०. श्री. राजाराम ओझरे, वि.स.स
२१. श्री. एम. एम. शेख, वि.प.स.
२२. डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.



२३. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

२६. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
२७. श्री. सुरेश हळवणकर, वि.स.स.
२८. श्री. दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव
(४) श्री. ना. रा. थिटे, अवर सचिव.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा " समिती प्रमुख " या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा दुसरा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ करिता समिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तिय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २०१०-२०११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१३-२०१४ साठी गठित झालेल्या समितीने गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने गोंदिया जिल्हा परिषदेस दिनांक ७, ८ व ९ जानेवारी, २०१४ रोजी भेट देऊन, श्री. ज्ञा. द. शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस दिनांक १७, १८ व १९ जुलै, २०१४ रोजी भेट देऊन, श्री.दिलीप पांढरपट्टे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१३-२०१४ करिता गठित झालेल्या समितीने गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्याबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २५ व २६ जून, २०१४ रोजी आणि दिनांक २ जुलै, २०१४ रोजी जिल्हा परिषद, गोंदिया तसेच दिनांक १६ जून, २०१५ रोजी व दिनांक १ जुलै, २०१५ रोजी जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी डॉ. एस. के. गोयल, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, श्रीमती मेधा गाडगीळ, अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, श्री. एस. एस. संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री. संजय कुमार, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, वित्त (सुधारणा) विभाग, श्री. नंदकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. प्रभाकर



देशमुख, सचिव, रोजगार हमी योजना विभाग, श्री.राजगोपाल देवरा, सचिव, आदिवासी विकास विभाग, श्री. आर. डी. शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री. दि. ग. मोरे, सह सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. प्रकाश ठुबे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. नरेश गिते, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गोपीनाथ आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, डॉ. सतीश पवार, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई, श्री. सु. सं. धांडे, मुख्य अभियंता, महावितरण कंपनी, मुख्य कार्यालय, मुंबई, श्री. वि. ज. सुरळकर, संचालक, विमा संचालनालय, मुंबई, श्री. अरविंदकुमार झा, प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग, श्री. भगवान, अपर प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग, तसेच श्री. का. मा. विधाते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्याबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१५-२०१६ साठी नव्याने गठित झालेल्या समितीने दिनांक २४ जुलै, २०१५ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २४ जुलै २०१५.

**संभाजी निलंगेकर-पाटील,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अनु- क्रमांक | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | **प्रकरण एक** | |
| | | **जिल्हा परिषद, गोंदिया** | |
| १ | १.१ | पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव अंतर्गत हात-पंप/विद्युत पंप/दुरुस्ती वर्गणीची थकबाकी. | १ |
| | १.२ | विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी वाढीव अर्थसहाय्य देण्याबाबत | ४ |
| | | **प्रकरण दोन** | |
| | | **जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग** | |
| २ | २.१ | प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या रिक्त पदाबाबत | ७ |
| | २.२ | (पंचायत समिती, वेंगुर्ले) जागा उपलब्ध नसलेल्या बेघर लोकांना घरकुल याजनेचा लाभ देण्याबाबत. | १२ |
| | २.३ | पाचवी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र तज्ज्ञ शिक्षक उपलब्ध करून देण्याबाबत | १६ |
| | २.४ | (पंचायत समिती, कुडाळ) मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी २० टक्के रकमेपेक्षा कमी खर्च केल्याबाबत. | १९ |
| | | **परिशिष्ट “ अ ”** | |
| | | शासनाचे आदेश व परिपत्रके | |
| | | **परिशिष्ट “ ब ”** | |
| | | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | |

# प्रकरण एक

## जिल्हा परिषद, गोंदिया

## पंचायत समिति अर्जुनी-मोरगांव

**१.१ पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव अंतर्गत हात पंप/विद्युत पंप/दुरुस्ती वर्गणीची थकबाकी :—**

गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ च्या अनुषंगाने दिनांक ८ जानेवारी २०१४ रोजी पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली.–

सन २०१०-२०११ मध्ये पंचायत समितीच्या गोदामातील वस्तुंची नोंदवह्यामधील नोंदीशी पडताळणी करण्यात आली आहे काय, असल्यास केव्हा आणि पडताळणीचे वेळी आढळून आलेल्या त्रुटीचे स्वरूप काय आहे, त्रुटीचे निराकरण कसे करण्यात आले, गोदामात सध्या किती व कोणकोणता माल शिल्लक आहे अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव यांचेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—**

सन २०१०-२०११ मध्ये गोदामातील वस्तुंची नोंदवही नुसार पडताळणी करण्यात आली आहे. दिनांक ११ जानेवारी २०११ ला पडताळणी करण्यात आली असून, कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आल्या नाहीत. गोदामात सध्या ऑईल इंजीन ९ नग, पेट्रोकेरोसीन पंप २ नग, विद्युत पंप ७६ नग, तीन फाळी नांगर १३ नग, एमी.बी.प्लो १३ नग व डायमेथोएट २२ लि., सल्फर ८५ कि. शिल्लक आहेत. अशी माहिती प्राप्त झाली.

समितीने अुर्जनी-मोरगांव पंचायत समितीस दिनांक ८ जानेवारी २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी, विद्युत पंपाच्या संदर्भात फिजिबिलिटी रिपोर्ट न मिळाल्यामुळे विद्युत पंप वितरित करता आले नाही. विद्युत जोडण्या देण्यास लाभार्थी योग्य आहेत की नाही या संदर्भात हा लागत असतो. हा अहवाल वीज वितरण कंपनी देत असते. सन २०१०-२०११ मध्ये ७६ पंप शिल्लक होते. परंतु त्यापैकी ६६ विद्युत पंप वितरित करण्यात आले असून, आता सर्व विद्युत पंप वितरित करण्यात आले आहेत. तसेच सन २०१२-२०१३ मधील विद्युत पंपाच्या वितरणाचे काम आता सुरू आहे, अशी माहिती प्राप्त झाली.

**समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यांबाबत अधिक महिती मागविली :—**

आजपर्यंत किती विद्युत पंप वितरित करण्याचे बाकी आहे व किती विद्युत पंपाना फिजिबिलिटी रिपोर्ट मिळाले नाहीत. वितरित केलेल्या किती पंपाना विद्युत जोडण्या देण्यात आलेले आहे व किती बाकी आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील माहिती प्राप्त झाली :—**

(१) पंचायत समिती अुर्जनी-मोरगांव, जि.गोंदिया यांनी प्रस्तुत वर्षी एकूण ११४ विद्युत पंपांचे पूर्ण वाटप केले असून, वाटप शिल्लक नाही.

(२) अद्याप ६१ विद्युत पंपांच्या प्रकरणी फिजिबिलिटी रिपोर्ट अप्राप्त आहेत.



(३) महावितरणाकडून एकूण २० विद्युत पंपाना विद्युत जोडणी देण्यात आली असून, अद्याप ९४ विद्युत पंप संचास विद्युत जोडणी देणे बाकी आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

गोंदिया जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दि. २६ जून २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे कृषी विभागाच्या अपर मुख्य सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव कडून अजून किती विद्युत पंपाचे वितरण करणे बाकी आहे या समितीच्या प्रश्नावर, ११४ विद्युत पंपांचे पूर्णपणे वाटप झाले आहे. ११४ विद्युत पंपांपैकी केवळ २८ विद्युत पंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. उर्वरित ८६ विद्युत पंपांना अजूनही वीज जोडण्या देण्यात आल्या नाहीत. विद्युत पंप वितरण योजना अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी होती. इन्फ्रास्ट्रक्चरचा खर्च महावितरण कंपनीने करावा. महावितरण कंपनी हा खर्च करण्यास तयार नसेल तर डी.पी.सी. किंवा राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतून निधी उपलबध करून द्यावा. परंतु यातून कमी रक्कम मिळते. कारण एक कनेक्शन देण्यासाठी दीड ते दोन लाख रुपये खर्च येतो आणि ही रक्कम भरल्याशिवाय महावितरण कंपनी जोडणीच देत नाही. योजनेतील ६ हजार रुपये शासनाने भरलेले आहेत. ज्या भागात विद्युत आणि विद्युत पंपांचा वापर मोठ्या प्रमाणावर आहे, त्या भागात कर्ज घेऊन इन्फ्रास्ट्रक्चरचा उभारण्याचे काम सुरू आहे, परंतु काही भागात रूरल इलेक्ट्रीफिकेशन कॉर्पोरेशनकडून कर्ज मिळत नाही. कारण लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती पाहूनच कॉर्पोरेशन त्यांना कर्ज पुरवठा करते. एस.सी.पी. ची तरतूद टप्प्या टप्प्याने प्रायोजित आहे. १९ हजार विद्युत पंपांपैकी साडेसात ते आठ हजार विद्युत पंपांच्या जोडण्यांसाठी ५१ कोटी रुपयांची तरतूद केली होती. उर्वरित १२-१३ हजार विद्युत पंपांना जोडण्या दिलेल्या नाहीत, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

गोंदिया जिल्ह्यामध्ये सन २०११-१२ मध्ये विद्युत पंप मंजूर झालेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना अद्याप वीज जोडणी मिळालेली नाही, त्यांच्या निविदा भरलेल्या आहेत की नाही याची शहानिशा करावी, या प्रश्नावर लाभार्थ्यांना विद्युत पंप मोफत दिलेले असून अद्याप ६,६५० विद्युत पंपांना जोडणी द्यायची आहेत. त्याकरिता आवश्यक असलेली रक्कम भरणा केली आहे. लाभार्थ्यांना कोणत्याही रकमेचा भरणा करावा लागणार नाही. फक्त इन्फ्रास्ट्रक्चरचा खर्च एस.सी.पी. मधून घेतल्याशिवाय किंवा डी.पी.सी. मधून तरतूद केल्याशिवाय पुढील काम होऊ शकणार नाही. ही योजना पूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आली होती. दिनांक २० जून २०१४ अखेर १९,१०५ पैकी ७,५२२ विद्युत पंपांना जोडणी दिली आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये हीच परिस्थिती आहे. या विभागीय सचिवांच्या खुलाशावर समितीने शासनाने सर्व जिल्ह्यांचा आढावा घेऊन राज्य वीज वितरण कंपनीशी चर्चा करून निर्णय घेतला पाहिजे असे मत प्रतिपादन केले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

समितीने अर्जुनी-मोरगांव पंचायत समितीच्या कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१०-११ या वर्षासाठी ७६ पंप शिल्लक असल्याचे आढळून आले. या संदर्भात फिजिबिलीटी रिपोर्ट न मिळाल्यामुळे

विद्युत पंप वितरित करता आले नाहीत असा समितीस खुलासा प्राप्त झाला. त्यावर शासन १००% विद्युतीकरणाचा प्रयत्न करीत असताना अशी उत्तरे समितीस प्राप्त झाल्याबाबत समितीने नापसंती व्यक्त केली. एकूण ११४ विद्युत पंपांचे वाटप झाले होते. त्यापैकी फक्त २८ वीज पंपाना वीज जोडणी देण्यात आली व उर्वरित ८६ विद्युत पंप वीज जोडणीच्या प्रतिक्षेत होते. विद्युत पंप वितरण योजना अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी होती. या योजनेतून एका जोडणीसाठी दीड ते दोन लाख रुपये खर्च येतो व ही रक्कम भरल्याशिवाय महावितरण कंपनी हा खर्च करण्यास तयार नाही. तथापि, रूरल इलेक्ट्रीफिकेशन कॉर्पोरेशन लाभार्थ्यांची कुवत पाहून कर्ज पुरवठा करते, त्यामुळे १९,१०५ विद्युत पंपांपैकी ७,५२२ विद्युत पंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या होत्या. उर्वरित अद्याप प्रलंबित आहेत.

ही परिस्थिती सर्वच जिल्ह्यांमध्ये असल्याने राज्यासाठी ही बाब अतिशय गंभीर असल्याचे मत समितीने व्यक्त केले आहे.

लाभार्थ्यांना विद्युत पंप मोफत दिलेले असून अजून ६,६५० लाभार्थ्यांना वीज जोडणी देणे बाकी आहे. याचा खर्च एस.सी.पी. वा डी.पी.सी. मधून केल्याशिवाय पुढील कामे होऊ शकणार नाहीत असेही मत समितीने व्यक्त केले आहे.

भारत देशाप्रमाणेच महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था सुद्धा शेतीवर आधारित आहे. गोंदिया/भंडारा हे जिल्हे " तलावांचे जिल्हे " म्हणून प्रसिद्ध आहेत. गोंदिया जिल्ह्यात तलावांद्वारे मुबलक पाणीपुरवठा शेतीसाठी हाऊ शकतो. तथापि, विद्युत पंपाना वीज जोडणी अभावी पाणीसाठा असूनही तो शेतीसाठी उपलब्ध होऊ शकत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

उक्त बाबी विचारात घेता शेतकऱ्यांना विद्युत पंपांचे विहित कालावधीत वाटप होणे व त्यांना विद्युत जोडणी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. **सबब, समिती शिफारस करते की, राज्यात ज्या भागात विद्युत पंपांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो आहे अशा ठिकाणी महावितरण कंपनी /डी.पी.सी./राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनापैकी कोणत्याही माध्यमाद्वारे विद्युत पंपांना जोडणी देण्यासंदर्भात ऊर्जा विभागाकडे प्रलंबित कृषी विद्युत पंपाची संख्या विचारात घेता वीज जोडणीचे प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात, त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध असूनही विजेअभावी त्यांचे शेतात सिंचन करता येत नाही व त्यामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक पावसावर अवलंबून राहावे लागते. वीज जोडण्या वेळीच दिल्या गेल्या तर शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणावर सिंचन होऊन त्याचा लाभ त्यांना मोठ्या प्रमाणावर मिळू शकतो. परंतु शासनाच्या उदासिन धोरणामुळे शेतकऱ्यांना दोन ते तीन वर्षे उलटूनही वीज जोडणी दिली जात नाही. पर्यायाने शेतकऱ्यांचे कृषी पंप असूनही त्यांचा उपयोग होत नाही. यास्तव शेतकऱ्यांचा कृषी पंपाच्या वीज जोडणीसाठी अर्ज आल्यास तो कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसांत निकाली काढून वीज जोडणी देण्यात यावी. ही वीज जोडणी तातडीने देण्याचे आदेश अधिकारी कार्यकारी अभियंता/उप अभियंता (विद्युत) यांना देण्यात यावेत आणि या संदर्भात स्वयंस्पष्ट व परिणामकारक शासन निर्णय निर्गमित करावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**



**१.२ विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी वाढीव अर्थसहाय्य देण्याबाबत :—**

गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ संदर्भात दिनांक ९ जानेवारी २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी, विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी २,००० रुपयांची जी रक्कम आहे ती अतिशय तुटपुंजी असल्यामुळे त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आणि सामूहिक विवाहामध्ये तर १० हजार रुपये दिले जातात याबाबत खुलासा करताना मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विधवा महिलेच्या मुलीच्या लग्नासाठी २ हजार रुपयांचीच तरतूद करण्यात आलेली आहे, अशी माहिती दिली.

**समितीने जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २६ जून, २०१४ रोजीच्या आयोजित साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेकडून खालील मुद्द्यांची माहिती मागविली.**

सन २०११-२०१२ मध्ये विधवा महिलेच्या मुलीच्या लग्नाकरिता सहाय्य देण्यात येत असलेले रु. २,००० चे अनुदान रकमेत वाढ करण्याबाबत शासनाचे काय धोरण आहे.

**जिल्हा परिषदेने उपरोक्त मुद्याबाबत समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती पुरविली.—**

शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग दिनांक २५ मे २००१ नुसार विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहाकरिता रु.२,००० अनुदान देणे ही योजना सुरू करण्यात आली होती. शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग संकीर्ण २०१२/प्र.क्र.२२०/का-२, दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ नुसार विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान योजना रद्द करून सदर योजना शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग संकिर्ण २०११/प्र.क्र.९३/का-१२, दिनांक ३० सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयातील शुभमंगल सामुदायिक विवाह योजनेत समायोजित करण्यात आलेली आहे व शुंभ मंगल सामूदायिक विवाह योजनेनुसार मुलींच्या विवाहाकरिता रु.१०,००० अनुदान देण्यात येणार आहे.

**उपरोक्त मुद्याबाबत महिला व बालविकास विभागाने समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती पुरविली.—**

महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणारी निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान ही योजना शहरी भागाकरिता, या विभागाचे संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत तर ग्रामीण भागाकरिता, जिल्हा परिषदेतील महिला व बाल विकास विभागामार्फत (अधिसूचना १९ ऑक्टोबर २००० नुसार हस्तांतरित योजना) राबविण्यात येत आहे.

दिनांक २५ मे २००१ चा योजनांचा सर्वसमावेशक शासन निर्णयानुसार या योजनेमध्ये रु.२,००० इतके अनुदान देण्याची तरतूद होती. तथापि, या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान रु.२,००० वाढविण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. त्यानुसार दिनांक २९ जानेवारी २०१४ रोजीच्या मंत्रीमंडळात याबाबत निर्णय होऊन, **महिला व बाल विकास विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण.२०१२/प्र.क्र.२२०/ का-२, दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ अन्वये योजनेच्या अनुदानात वाढ करून रुपये १०,००० इतके अनुदान करण्यात आलेले आहे** (सोबत शासन निर्णय दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ ची प्रत सादर).

या दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ चे शासन निर्णयानुसार निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान ही योजना रद्द करून, शासन निर्णय दिनांक ३० सप्टेंबर २०११ अन्वये कार्यान्वित शुभ मंगल सामूदायिक विवाह योजनेची व्याप्ती वाढवून, ती केवळ शेतकरी/शेतमजूर यांच्यासाठी न ठेवता, अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग वगळता अन्य प्रवर्गातील रुपये एक लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार/ परित्यक्त्या आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहाकरिता शासन निर्णय दिनांक ३० सप्टेंबर २०११ मधील इतर अटी/शर्तीनुसार मंजूर करण्याचा निर्णय झालेला आहे. या योजनेची अंमलबजावणी दिनांक ०१/०१/२०१४ पासून करण्यात येणार असून, योजना पूर्णतः जिल्हा नियोजन समितीमार्फत राबविण्यात येणार असून, याकरिता जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

समितीने दिनांक २६ जून २०१४ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २०११-१२ मध्ये विधवा महिलेच्या मुलीच्या लग्नाकरिता सहाय्य देण्याबाबत शासनाचे धोरण स्पष्ट करतांना, शुभमंगल योजनेच्या माध्यमातून अनुदानाची रक्कम रु.१०,००० इतकी केली आहे. अशी विभागीय अधिकाऱ्यांनी समितीस माहिती दिली.

सामूहिक विवाह सोहळ्यात विधवेच्या मुलीने विवाह केला आणि ती अनुसूचित जातींची असेल तर तिला दोन्ही योजनेतून अनुदान दिले जाईल काय याबाबत समितीच्या प्रश्नावर दोन्ही लाभ मिळू शकत नाही. एकाच प्रकारचे अनुदान मिळू शकेल असे समितीस सांगण्यात आले. पुढे समितीने विधवेच्या मुलीने नोंदणी पद्धतीने विवाह केले असेल तर अनुदान दिले जाईल काय अशी विचारणा केली असता नोंदणी पध्दतीने विवाह केला असेल तरी अनुदान देण्यात येते. सन २०११ पासून ही योजना लागू झाली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना २,००० रुपये अनुदान दिले जाते आणि ही शुभमंगल योजना असून ती जिल्हा समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१ यांच्यामार्फत राबविली जाते असा खुलासा साक्षीच्या वेळी प्राप्त झाला.

आंतरजातीय विवाह करणारी मुलगी जर विधवा किंवा परित्यक्त्या असेल तर तिला सामाजिक न्याय विभाग आणि महिला व बालविकास विभाग या विभागांच्या शासन निर्णयान्वये योजनांचा लाभ मिळू शकतो काय या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अशा वेळी आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्याचा सत्कार करून त्यांना ५० हजार रुपये अनुदान दिले जाते आणि ही योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविली जाते. महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग प्रवर्ग वगळता अन्य प्रवर्गात रु. १ लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार, परित्यक्त्या आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहासाठी अनुदान दिले जाते अशी माहिती समितीस साक्षीच्या वेळी प्राप्त झाली. सामूहिक विवाह सोहळे आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रत्येक जोडप्याच्या विवाहामागे सध्या मिळणारे रु.२००० इतके अनुदान वाढविण्याची गरज ही समितीने प्रतिपादन केली.



**अभिप्राय व शिफारशी :–**

विधवा महिलेच्या मुलीच्या लग्नासाठी शासनाने सन २०११ पासून रु.२,००० एवढ्या रकमेची तरतूद केलेली आहे.शुभमंगल नोंदणीकृत विवाह योजनेंतर्गत मुलीच्या विवाहासाठी तिच्या हयात असलेल्या आई/ वडील यांच्या नाव्याने रु.१०,००० अनुदान देण्यात येते व विवाह आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना प्रती जोडपे रु.२,००० अनुदान देय असते. आंतरजातीय विवाह सामाजिक न्याय विभागामार्फत करणाऱ्या जोडप्यास रु.५०,००० तसेच महिला व बालविकास विभागामार्फत विधवा व परित्यक्त्या यांच्या मुलीच्या विवाहासाठी रु.१०,००० एवढे अनुदान देय असते. **ही सर्व अनुदानाची रक्कम सध्याची महागाई पहाता अत्यंत अल्प असून प्रचलित शासन निर्णयामध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे अशी समितीची धारणा झालेली आहे.**

**शुभमंगल योजनेअंतर्गत अथवा विधवा महिलेच्या मुलीचे विवाह आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना विवाह खर्च अथवा अनुदान म्हणून रु.२,००० देण्यात येतात. त्या ऐवजी रु.५,००० शुभमंगल नोंदणीकृत विवाह योजनेंतर्गत मुलीच्या विवाहासाठी रु.१०,००० ऐवजी रु.२५,००० एवढे अनुदान तसेच आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन म्हणून देणाऱ्या रकमेत आवश्यक ती वाढ करण्यात यावी. तसेच या विवाह इच्छुक जोडप्यांना लाभ देताना ज्या कागदपत्रांची मागणी करण्यात येते ती वेळ खाऊ असून लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यास प्रचंड विलंब होत असल्याने या अटी शिथील करून सोप्या व सुटसुटीत पद्धतीने लाभ देण्याबाबत विभागाने शासन निर्णयात तात्काळ दुरुस्ती करून कार्यवाही करावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

**२.१ प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या रिक्त पदाबाबत :–**

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जुलै, २०१४ या कालावधीत सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१०-२०११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक एक बाबत दिनांक १९ जुलै, २०१४ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयामध्ये एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांबरोबरच बीएएमएस व बीएचएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत तसेच शासनाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी खास बाब म्हणून बीएएमएस व बीएचएमएस डॉक्टरांची भरती करण्याची परवानगी दिलेली आहे. तथापि, हे अभियान डिसेंबर, २०१३ मध्ये संपलेले आहे, याबाबत समितीने माहिती मागितली. तसेच पुरेशा प्रमाणात एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे पूर्वी बीएएमएस व बीएचएमएस डॉक्टरांची नियुक्ती करण्यास आता अशी परवानगी नसल्यामुळे बीएएमएस व बीएचएमएस डॉक्टरांची नियुक्ती करता येत नाही. तथापि, बीएएमएस व बीएचएमएस डॉक्टर मिळत असतील तर त्यांची नियुक्ती केली पाहिजे व रुग्णाना आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे. तसेच काही डॉक्टरांना त्यांची १५ ते २० वर्षे सेवा झालेली असून देखील त्यांना सेवेत कायम करण्यात आलेले नाही. त्यांना सध्या एक-एक वर्षाची मुदतवाढ दिली जाते. या सर्व डॉक्टरांना सेवेत कायम सरूपी सामावून घेण्याची आवश्यकता समितीने प्रतिपादीत केली.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्याची माहिती मागितली.**

प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची आरोग्य सेवा १५ ते २० वर्षे होऊनही त्यांना सेवेत कायम करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

वैद्यकीय अधिकारी नियुक्तीचे अधिकार शासनस्तरावर आहेत. शासनाकडून नामनिर्देशनाची वैद्यकीय अधिकारी पदे भरली जातात. परंतु या जिल्हा परिषदेकडे १५ ते २० वर्षे सेवा झालेले वैद्यकीय अधिकारी कायम करणेचे नाहीत.

**समितीस शासनाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) उमा देवी विरुद्ध कर्नाटक शासन या न्यायालयीन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या आधारे कर्नाटक शासनाने कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवेत समावेशन करण्यासठी नियम विहित केलेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील अस्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिनांक ३१ डिसेंबर २००७





रोजी ३ वर्षाची सेवा पूर्ण केलेली आहे व जे दि.२.२.२००९ या अधिसूचनेच्या दिनांकास सेवेत आहेत अशा अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एक वेळचे समावेशन करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (महाराष्ट्रात अस्थायी म्हणून नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एक वेळचे समावेशन) विशेष नियम,२००९ केले आहे. सदर नियमातील तरतुदीनुसार अस्थायी वैद्यकीय अधिकारी दि.२.२.२००९ या अधिसूचनेच्या दिनांकास सेवेत होते अशा एकूण १४२१ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ अंतर्गत वैद्यकीय अधिकारी या पदावर समावेशन करण्यात आलेले आहे.

वैद्यकीय अधिकारी या पदाची नियमित सेवेत मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्याने आरोग्य सेवा व्यवस्थित सुरळीत सुरु राहण्याच्या उद्देशाने शासनाने अस्थायी वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग/स्वतंत्र निवड मंडळ यांचेकडून एम.बी.बी.एस./ बी.ए.एम.एस. उमेदवार उपलब्ध होईपर्यंत नेमणूक सुरु राहील या अटीवर प्राथमिक आरोग्य केंद्र, फिरती पथके इत्यादी ठिकाणी / विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अस्थायी नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. सदर अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे शासन सेवेत समावेशन करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाकडून अधिक माहिती मागविण्यात आली असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) शासन अधिसूचना दि.२/२/२००९ अन्यये अस्थायी एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सन २००९-१० मध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गात समावेशन करण्यात आले आहे. तसेच त्यावेळी काही अस्थायी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे जे ८०००-१३५०० या वेतनश्रेणीत कार्यरत होते त्या अधिकाऱ्यांचे समावेशन सुद्धा करण्यात आलेले आहे. तथापि, काही बी.ए.एम.एस. अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समावेशन न झाल्यामुळे त्यांनी मा.न्यायाधिकरणात मुळ अर्ज दाखल केले होते. सदर प्रकरणी मा.न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार शासन अधिसूचना दि.२/२/२००९ मध्ये नमूद अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या इतर अस्थायी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गात समावेशन करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी उपस्थित झालेल्या उपरोक्त मुद्यांवरुन अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १६ जून, २०१५ रोजी विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली.

प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत डॉक्टरांची सेवा १५ ते २० वर्षे होवूनही त्यांना सेवेत कायम करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे अशी समितीने विचारणा केली असता सदरहू विषय स्थायी व अस्थायी वैद्यकीय अधिकारी यांच्या बाबतचा आहे. शासनाच्या मान्यतेने शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची स्थायी व अस्थायी पदे वेळोवेळी भरण्यात आलेली आहेत. तरी देखील राज्यभरामध्ये अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रांना बंद करण्याची वेळ आलेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. तसेच आरोग्य संचालकांनी समितीला याबाबत अधिक माहिती दिली

की, राज्यभरामध्ये वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ७१७६ मंजूर पदे आहेत. वैद्यकीय अधिकारी यांची सेवा अत्यावश्यक सेवा यामध्ये येते. पुर्वी ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भरण्यात येत होती. परंतु महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून पद भरतीच्या प्रक्रियेला विलंब लागत असल्याकारणाने वैद्यकीय अधिकारी यांची अत्यावश्यक सेवा लोकांना तत्पर मिळणे आवश्यक आहे. याकरिता विभागाने स्वतंत्र व स्वायत्त निवड मंडळाची स्थापना केलेली आहे. आता या स्वतंत्र निवड मंडळाच्या माध्यमातून वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक व बदल्या होत असतात. सन २००९ मध्ये या स्वतंत्र निवड मंडळाच्या माध्यमातून १४०० वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्यात आलेली आहेत. या निवड मंडळाच्या नियमित बैठका होतात. या बैठकांमध्ये राज्यभरामध्ये आवश्यकता असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांची संख्या, त्यांच्या नेमणूका व बदल्या यांचे नियमन केले जाते.

तसेच समितीस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूक प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती देताना बी.ए.एम.एस. च्या ६०० पदांकरिता जाहिरात दिल्यानंतर २१०० अर्ज आले होते. तसेच एम.बी.बी.एस.च्या ३०० पदांच्या जाहिरातीकरिता १९०० अर्ज आले होते, त्यापैकी काही जण समुपदेशन व इतर संबंधित पद नेमणूक व परिक्षेकरिता उपस्थित राहिले नव्हते असे समितीस सांगण्यात आले.

समितीने विचारणा केली की, राज्यात वैद्यकीय अधिकारी कार्यरत नसल्याने अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकाऱ्यांअभावी बंद करण्याची वेळ आलेली आहे. एम.बी.बी.एस. डॉक्टरांच्या अहर्तेप्रमाणे बी.ए.एम.एस. डॉक्टरांना अहर्ता प्राप्त झालेली आहे. तरी तेथे बी.एम.एम.एस. डॉक्टर नेमण्यासंदर्भात आणि एम.बी.बी.एस. डॉक्टरांनी शासनाच्या सेवेत यावे याकरिता त्यांची मानसिकता विचारात घेण्याबाबत विभागाने कोणती कार्यवाही केली आहे, याबाबत माहिती देताना आरोग्य संचालकांनी, महाराष्ट्रात एकूण ७१७६ वैद्यकीय अधिकाऱ्यांची मंजूर पदे आहेत. ४१७४ वैद्यकीय अधिकारी नियमितपणे कार्यरत आहेत. ८८९ वैद्यकीय अधिकारी बॉण्डींग पद्धतीने कार्यरत आहेत. ६५६ वैद्यकीय अधिकारी अस्थायी पद्धतीने काम करीत आहेत. ९०० वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. गट ' ब ' वैद्यकीय अधिकारी यांची समायोजन प्रक्रिया सुरु आहे. बी.ए.एम.एस. डॉक्टरांना सर्जरी, भूल देणे आदि बाबींचे सखोल ज्ञान नसते, त्यामुळे त्यांच्याकडे आलेल्या रुग्णास ते सर्जन किंवा एम.बी.बी.एस. यांच्याकडे संदर्भित करतात. १४०० डॉक्टर्सच्या समायोजनाचे आदेश आरोग्य संचालनालयाने काही महिन्यांपूर्वी काढलेले आहेत. अस्थायी तत्वावर काम करीत असलेल्या काही वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेमध्ये कायम करण्याचा निर्णयही बोर्डाने घेतलेला असून त्यासंदर्भात कार्यवाही सुरु होणार आहे. ६५० डॉक्टर्सची नियुक्ती केल्यानंतरही केवळ ४० टक्के उमेदवार पदावर रुजू होतात. उर्वरित उमेदवार समुपदेशनालाही येत नाहीत. याबाबत काही प्रमाणात पास झालेल्या उमेदवारांची मानसिकता व मागण्याही विचारात घेणे आवश्यक आहे. विभाग आणि बोर्ड आता नव्याने रुजू होणाऱ्या किंवा उमेदवारांच्या मागण्या ध्यानात घेऊन त्यांना नियुक्त्या देण्याकरिता एकाच हॉलमध्ये बसवून एकाच मॉनिटरवर राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा त्यांना दाखविल्या जातात. त्यापैकी त्यांना कोठे पदस्थापना हवी आहे, हे विचारले जाते. याप्रमाणे उमेदवारांच्या मानसिकतेचा व मागण्यांचा अभ्यास व विचार विभागाच्या माध्यमातून केला जात आहे, असे समितीस अवगत केले.





एखाद्या रुग्णालयात जर मशिनरी नाही हे समजू शकते. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्र डॉक्टरअभावी बंद व्हायला आले असतील आणि तेथे देण्याकरिता एम.बी.बी.एस. डॉक्टर नसेल तर त्या ऐवजी उपलब्ध असलेल्या बी.ए.एम.एस. डॉक्टरांची नेमणूक करण्यास हरकत नाही. दुर्गम भागामध्ये काम करणे शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याला नियमानुसार सक्तीचे करणे आवश्यक आहे. वैद्यकीय अधिकाऱ्याचे अ, ब, क आणि ड असे वर्गीकरण करण्यात येणे आवश्यक आहे. दुर्गम भागामध्ये ठराविक वर्षे काम केल्यानंतर पुढील कॅटेगरीमध्ये प्रमोशन होऊन बदली करण्यात येईल. असा सक्तीचा नियम लागू करणे आवश्यक आहे असे समितीने मत प्रतिपादन केले.

वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय रुग्णालय येथे आठ ते बारा वर्षे डॉक्टर्स अस्थायी स्वरुपात एक दिवसाचा खंड तत्त्वावर काम करीत आहेत. त्यांची सेवा लक्षात घेता त्यांना सेवेमध्ये कायम करण्याबाबत शासनाचे निश्चित धोरण काय आहे अशी समितीने विचारणा केली असता, या डॉक्टरांना कायम करण्याबाबत शासनाकडून तपासणी करुन माहिती घेतल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच नविन नेमणूका व बदल्या या संदर्भातील धोरणात्मक निर्णय अंतिम स्वरुपात येण्याकरिता विभागीय पातळीवर प्रयत्न केला जात आहे. या प्रक्रियेला काही वेळ लागण्याची आवश्यकता आहे. परंतु विभागाच्या वतीने ग्रामीण भागामध्ये आरोग्य केंद्र व जिल्हा रुग्णालयामध्ये डॉक्टरअभावी ग्रामीण व गरीब जनतेला वैद्यकीय सेवेला मुकावे लागणार नाही, याकरिता शासन प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी नेमण्याबाबत शासन निर्णय घेत आहे अशी समितीस विभागीय सचिव यांनी माहिती दिली.

**अभिप्राय व शिफारशी :**

केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा १५ ते २० वर्ष झाली आहे त्यांना सेवेत कायम करण्यात आलेले नाही तसेच एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहण्याचे प्रमाणही जास्त आहे, असे समितीच्या निदर्शनास आले. या उलट बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे अतिरिक्त भरण्यात आली आहेत. मुळात नियुक्ती पत्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी केवळ ४०% वैद्यकीय अधिकारी सेवेत रुजू होतात असा सर्वसाधारण अनुभव आहे. तसेच राज्यात डोंगराळ भाग, आदिवासी क्षेत्र इ. दुर्गम भागात वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाच्या सेवेत असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच पुरेशा प्रमाणात एम.बी.बी.एस. डॉक्टर उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे पुर्वी बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस. डॉक्टरांची नियुक्ती करण्यास शासनाने परवानगी दिली होती. परंतु आता अशी परवानगी नाही. त्यामुळे बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस. डॉक्टरांची नियुक्ती करता येत नाही. एम.बी.बी.एस. डॉक्टरांची अनुपलब्धता विचारात घेता बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस. डॉक्टर उपलब्ध होत असतील तर अशा डॉक्टरांची नियुक्ती करुन रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, असे मत समितीने व्यक्त केले.

**सध्याच्या शासन निर्णयानुसार २५% पेक्षा जास्त बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती शासनास करता येत नाही आणि यामुळे राज्यात सुमारे ९०० वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून रुग्णसेवा पुरविण्यात विलंब होत असल्यामुळे, सध्या अस्तित्वात असलेल्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात यावी व त्यानुसार बीएएमएस/बीएचएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचे २५% हे प्रमाण वाढविण्यात यावे, तसेच शासनाच्या सेवेते असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनात समाधानकारक वृध्दी करण्यात यावी. तसेच त्यांच्या बदल्यांच्या धोरणात बदल करण्यात यावा. त्याचप्रमाणे त्यांना कायम करण्याच्या कालावधीमध्ये देखील शासनाने सकारात्मक विचार करुन तातडीने कार्यवाही करावी. जेणेकरुन एमबीबीएस व पदवीधर डॉक्टर खाजगी सेवेत स्वारस्य न दाखविता शासन सेवेत येण्यास सर्वतोपरी तयार होतील. तसेच राज्यात रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा तातडीने भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**



**२.२ (पंचायत समिती, वेंगुर्ले) जागा उपलब्ध नसलेल्या बेघर लोकांना घरकुल याजनेचा लाभ देण्याबाबत :—**

पंचायती राज समितीने दिनांक १८ जुलै २०१४ रोजी मौजे पालकरवाडी, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग ग्रामपंचायतीला भेट दिली असता तेथील ग्रामसेवकाने समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेघरांची मोठी संख्या आहे. त्याचप्रमाणे घरकुलांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी शिल्लक आहे. परंतु या जिल्ह्यात घरकुलांसाठी जमीनी मिळत नसल्यामुळे घरकुलांचे बांधकाम करता येत नाही व त्यामुळे बेघर कुटुंबे या योजनेपासून वंचित आहेत. या जिल्ह्यासाठी घरकुल बांधकामाबरोबरच जमीन विकत घेण्यासाठी देखील शासनाने अनुदान देण्याची आवश्यकता आहे किंवा जमीन अधिगृहीत करुन घरकुलांसाठी ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे या जिल्ह्यांसाठी शासनाने गावठाण विस्ताराची विशेष योजना राबविण्याची देखील आवश्यकता आहे असे समितीच्या निदर्शनास आले.

**समितीने साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेघर लोकांची संख्या १ लक्षपेक्षा अधिक दिसून येते. या बेघरांना घरकुल योजनांचा लाभ का दिला नाही, अशी भेटीच्या वेळी विचारणा केली असता, सिंधुदुर्ग जिल्ह्यात जागेचा मोठा प्रश्न असून ज्या बेघर लोकांकडे जागा उपलब्ध नाहीत अशांना घरकुल बांधून देता येत नाही. तेव्हा अशा लोकांना घरकुल बांधून देण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाची काय भूमिका आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्याची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेघर लोकांची संख्या १ लाख इतकी नसून ती फक्त १९३२५ इतकी आहे.

२) दारिद्र्य रेषेखालील कुटुंब गणना-२००२ नुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण ७१३८६ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे आहेत.

३) इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार घरकुल लाभार्थ्याला जागा घेण्यासाठी रक्कम रुपये २०,००० इतके अनुदान ५०:५० टक्के या प्रमाणात केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) ग्रामपंचायत पालकरवाडी, पंचायत समिती वेंगुर्ले व सिंधुदुर्ग जिल्ह्याची दारिद्र्य रेषेखालील संख्या, घरकुल पात्र लाभार्थ्यांची संख्या दर्शविणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :—

| तालुका/जिल्हा/ग्रा.पं. | | एकूण दा.रे. संख्या | एकूण बेघर संख्या | सन २०१३-२०१४ अखेर लाभ दिलेले | शिल्लक बेघर | जागा नसलेले | जागा असलेले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रा. पं. पालकरवाडी | . . | १९५ | ४९ | ३१ | १८ | १८ | ० |
| पं. स. वेंगुर्ला | . . | ७४२५ | १३८६ | ६०७ | ७७९ | ५०७ | २७२ |
| जिल्हा सिंधुदुर्ग | . . | ७१३८६ | १९३२५ | ११९५६ | ७३६९ | २५२५ | ४८४४ |

- ज्यांच्याकडे जमीन नाही अशा लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार रु.२० हजार अनुदान देण्याची तरतूद आहे. तथापि, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा असल्याने जागेचे शासकीय/बाजारभाव हे जास्त आहेत. त्यापेक्षा जागा खरेदीसाठी मिळणारे अनुदान हे अल्प आहे.
- जिल्ह्यातील वेंगुर्ला, मालवण व देवगड या तालुक्यातील बराच भाग CRZ खाली येत असलेने तेथे बांधकाम करता येत नाही.
- जिल्ह्यातील बरीचशी जमीन ही सामाईक/तुकडे पद्धतीची असून सहहिस्सेदारांची परवानगी मिळत नसलेने जागा उपलब्ध होत नाही.

**तसेच समितीस शासनाकडून उपरोक्त मुद्याची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याची घरकुल योजना शासन निर्णय दिनांक १५/११/२००८ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ९/६/२०१० च्या शासन निर्णयान्वये योजनेची अंमलबजावणी करण्यासंबंधात सविस्तर आदेश देण्यात आलेले आहेत.

सदर योजनेंतर्गत २६९ चौरस फुटाचे घरकुल बांधून देण्यात येते. सदर योजना रमाई आवास योजना म्हणून राबविण्यात येत असून सदर योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत राबविण्यात येते. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी एकूण ४३१ घरकुले मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी २५३ पूर्ण झाली असून १७६ प्रगतीपथावर आहेत. २ घरकुले रद्द करण्यात आली आहेत. या लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा उपलब्ध नाही अशा लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करता येत नाहीत. तथापि, शासनामार्फत जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात प्रस्ताव विचाराधीन आहे.

या संदर्भात ग्रामविकास विभागाने माहिती दिली की,—

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेघर लोकांची संख्या १ लाख इतकी नसून ती केवळ १९३२५ इतकी आहे.

(२) सन २००२ च्या सर्व्हेनुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे ७१३८६ इतकी आहेत.

(३) इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे जागा घेण्यासाठी सध्या रु.२०,०००/- इतके अनुदान ५०:५० टक्के या प्रमाणात केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाते.

(४) ज्यांच्याकडे जमीन नाही अशा लाभार्थ्यांना जमीन खरेदीसाठी रक्कम रु.५०,०००/- एवढी रक्कम देण्याकरिता पंडित दीनदयाल उपाध्याय योजना प्रस्तावित आहे.

(५) जिल्ह्यातील वेंगुर्ला, मालवण व देवगड तालुक्यातील बराचसा भाग हा CRZ खाली येत असल्याने बांधकाम करता येत नाही.

(६) जिल्ह्यातील बरीचशी जमीन ही सामाईक/तुकडे पद्धतीची असून सह हिस्सेदारांची परवानगी मिळत नसल्याने जागा उपलब्ध होत नाही.

(७) सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा असल्याने जागेचे, शासकीय व खुल्या बाजारातील भाव हे जास्त आहेत. जागा खरेदीसाठी मिळणारे अनुदान हे अत्यंत अल्प आहे.



तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याची रमाई घरकुल योजना शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर २००८ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ९ मार्च २०१० च्या शासन निर्णयान्वये योजनेची अंमलबजावणी करण्यासंबंधात सविस्तर आदेश देण्यात आलेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी एकूण ४३१ घरकुले मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी २५३ घरे पूर्ण झाली असून १७६ प्रगतीपथावर आहेत. २ घरकुले रद्द करण्यात आली आहेत. त्या लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा नाही अशा लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करता येत नाहीत. यास समाजकल्याण आयुक्तालयाने दिलेल्या अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग अंतर्गत ग्रामपंचायत पालकरवाडी ता.वेंगुर्ला येथील भेटीच्या वेळी समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १६ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, अनुसूचित जाती व नवबाद्ध घटकांसाठी ग्रामीण व शहरी भागांमध्ये स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याची रमाई घरकुल योजना आहे. ही योजना सन २००८ पासून राबविण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण ४३१ घरकुल मंजूर झाली. त्यापैकी २५३ घरे पूर्ण झाली असून १७६ घरांची कामे प्रगतीपथावर आहेत. दोन घरकुले रद्द करण्यात आली आहेत. ज्या लाभार्थ्यांची स्वतःची जागा नाही त्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. पुर्वी गायरान जमीन घरकुल योजनेसाठी घेता येत होती. परंतु माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार गायरान जमीन घरकुलासाठी घेता येत नाही, त्यामुळे थोडी अडचण आहे. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांना जमीन विकत घेण्यासाठी राज्य शासनाचे रु.१०,०००/- आणि केंद्र शासनाचे रु.१०,०००/- अशी योजना आहे.

जे लोक शासकीय जमीनीवर अतिक्रमण करुन राहत आहेत अशा लोकांचे शासनाने सर्व्हेक्षण केले आहे काय, त्यांना जमिनीचे पट्टे शासन देऊ शकतो काय, अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी नमूद केले की, सर्व लाभार्थी अतिक्रमित जागेवर राहतात असे नाही. जे नातेवाईकांच्या जागेवर राहतात, ज्यांना स्वतःच्या मालकीची जमीन नाही असे लाभार्थी या योजनेस पात्र ठरत नाहीत. इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे लाभार्थ्यांला रु.२०,००० अनुदान देण्यात येते. केंद्र आणि राज्य शासनाचा हिस्सा ५० टक्के असतो. परंतु ग्रामीण भागामध्ये रु.२०,००० रुपयांमध्ये जमीन मिळत नाही. मार्च महिन्यात मा.वित्त मंत्री महोदयांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना जाहीर केलेली आहे. लाभार्थ्यांना स्वतःची जागा खरेदी करण्याकरिता रु.५०,००० मदतीची ती योजना आहे.

एखादी व्यक्ती २०-२५ वर्षापासून अतिक्रमित जागेवर राहत असेल तर शासनाने त्याला घर बांधण्याची परवानगी द्यावी. ग्रामपंचायतीने त्याला ८(अ) द्यावा. त्यासाठी शासनाने १०-१५ वर्षाची अट घालावी. दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांची यादी संपली असेल तर शासनाला दारिद्र्यरेषेवरील लाभार्थ्यांची निवड करता

येते. असे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी आलेले असतील तर शासनाने त्यास मान्यता देण्याची आवश्यकता आहे. जर एखाद्याला घर बांधायचे असेल तर तो एक-दोन गुंठे जमीन घेऊन घर बांधणार, शासनाने वेळप्रसंगी मुंबई जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ यामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. एक-दोन गुंठ्याचे खरेदी खत करण्यास मान्यता देण्याची आवश्यकता आहे.

ग्रामपंचायतीने त्याला ८(अ) दिला तर तो झोपडपट्टी लाभधारक होऊ शकतो. शासनाने १९९५ पुर्वीच्या झोपड्या कायम केलेल्या आहेत. ज्या गावात गावठाण वाढत असेल त्या ठिकाणी गावठाण वाढविले पाहिजे. परंतु, त्यास जिल्हाधिकारी मान्यता देत नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडे असे असंख्य प्रस्ताव प्रलंबित आहेत. शासकीय गावठाण जमीनीबाबत निर्णय घेण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता आहे, या बाबी साक्षीच्या वेळी समितीने प्रतिपादित केल्या.

**अभिप्राय व शिफारशी :–**

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला भेट दिली असता भेटीच्या वेळी जिल्ह्यात १९३२५ लोक बेघर असल्याचे समितीस आढळून आले. शासनाच्या विविध विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजना जसे इंदिरा आवास व रमाई आवास योजना ई. अस्तित्त्वात असूनही बेघर कुटुंबांची संख्या लक्षणीय आढळून आली. जिल्ह्यामध्ये बरीचशी जमीन ही सामायिक/तुकडे पदधतीची असून सह हिस्सेदारांची परवानगी मिळत नसल्यामुळे जागा उपलब्ध होत नाही आणि बहुतांश भाग सीआरझेड अंतर्गत असल्यामुळे बांधकाम करता येत नाही, ही अडचण समिती समक्ष मांडण्यात आली.

संपूर्ण राज्यात थोड्या अधिक फरकाने हीच परिस्थिती आढळून येते. इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे लाभार्थ्यांला ग्रामीण भागात जमीन विकत घेण्यासाठी रु.२०,००० अनुदानामध्ये जमीन उपलब्ध होत नाही. सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात राज्याच्या अर्थमंत्र्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना जाहीर केलेली आहे. सदरहू योजनेची अंमलबजावणी लवकरच सुरु होणार असल्याबाबत विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले आहे.

**राज्यातील बेघर लोकांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये खालील बदल करावेत अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

**(१) राज्यात शासकीय योजनांमधून घरकुल मंजूर करताना ज्या लाभार्थ्याकडे स्वत:ची जागा नाही त्यांना शासनाच्या खर्चाने जागा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्याबाबत व जागेअभावी कोणी व्यक्ती बेघर राहू नये यासाठी स्वयंस्पष्ट व सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करण्यासंदर्भात विभागाने तातडीने कार्यवाही करावी.**

**(२) जे लाभार्थी शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण करुन १० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून वास्तव्य करीत आहेत अशा लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीकडून ८ (अ) चा उतारा त्यांच्या नावाने उपलब्ध करुन देण्याबाबत सत्वर व तातडीने कार्यवाही करुन त्यांना त्याच जागेवरील घरकुलास मंजुरी व बांधकाम करण्यासंदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा.**



**(३) तामिळनाडू राज्यामध्ये अंमलात असलेल्या घरकुल योजनेमध्ये २-३ मजल्यांची योजना आहे. त्याच धर्तीवर राज्यात २-३ मजल्यांच्या घरकुलाची योजना राबविता येऊ शकते किंवा कसे याचा शासनाने सर्वंकष अभ्यास करुन निर्णय घ्यावा.**

**(४) ग्रामीण भागात घरकुलाच्या लाभार्थ्यांना १-२ गुंठे जमीन विकत घेऊन घर बांधण्यासाठी मुंबई जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मधील तरतुदीनुसार खरेदी खत करता येत नाही. अतः सदरहू अधिनियमात शासनाने योग्य ती सुधारणा करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी.**

**(५) बहुतांश वेळा संबंधित ग्रामपंचायतीच्या गावठाणाचा विस्तार झालेला नसतो, त्यामुळे घरकुल मंजूर करत असताना अडचणी उद्‌भवतात. या प्रकरणी गावठाण हद्द वाढविण्याबाबत संबंधित विभागांनी शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवावेत व शासनाने त्यास सत्वर मान्यता द्यावी.**

**(६) सिंधुदुर्ग जिल्ह्यात घरकुल मंजूर असूनही केवळ जागेअभावी घरकुल बांधता येत नाही अशा बेघर व्यक्तींकरिता संबंधित व्यक्तींना घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन त्या-त्या गावांतील उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीवर अथवा खाजगी व्यक्तींकडून विकत घेऊन प्रचलीत शासन निर्णयात बदल करुन सदर बेघर व्यक्तींचे घरकुल स्वप्न पूर्ण करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.**

**उक्त शिफारशींप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत अवगत करण्यात यावी, अशीही शिफारस समिती करीत आहे.**

**२.३ पाचवी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र तज्ञ शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत :- (पंचायत समिती वेंगुर्ले)**

पंचायती राज समितीने दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी मौजे मठ, तालुका वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देवून पाहणी केली असता, समितीच्या निदर्शनास आले की, या शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी आहे. तसेच पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र तज्ञ शिक्षक उपलब्ध नसून एकच शिक्षक सर्व विषयांच्या अध्यापनाचे काम करीत आहेत. परिणामी येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

**समितीने साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागिवली.**

जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा क्र.१ मठ, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग या शाळेला समितीने भेट दिली असता तेथे विद्यार्थ्यांची पट संख्या कमी असून तेथे पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित हा विषय एकच शिक्षक शिकविताना आढळून आला. स्वतंत्र तज्ञ शिक्षक उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाची काय भूमिका आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्याची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा मठ नं.१, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग ही इ. १ ली ते ७ वी पर्यंतची शाळा आहे. इ. ६ वी ते ८ वी चे वर्ग असतील तर दि.१३ डिसेंबर, २०१३ चे शासन निर्णयानुसार ३ पदवीधर शिक्षक

मंजूर होतात. जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा मठ नं.१ येथे इ. ६ वी व ७ वी असे दोनच वर्ग आहेत. त्यामुळे शाळेला १ भाषा विषयासाठी व १ समाजशास्त्र विषयासाठी अशी २ पदवीधर शिक्षक पदे मंजूर आहेत. सदर दोन्ही पदे भरलेली आहेत. इ.८ वी चा वर्ग नसल्यामुळे विज्ञान व गणित विषयासाठीचे तिसरे पदवीधर शिक्षक पद मंजूर नाही. पंचायत राज समितीचे भेटी दिवशी १ पदवीधर शिक्षक हे हृदयविकाराची शस्त्रक्रिया झाल्याने रजेवर होते. म्हणून पंचायत राज समितीच्या भेटी दिवशी एकच शिक्षक अध्यापन करताना आढळला.

**समितीस शासनाकडून उपरोक्त मुद्याची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधून ३० सप्टेंबर रोजीच्या पटावर शिक्षकांचे पदांची पद निश्चिती केली जाते. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील दिनांक १३ डिसेंबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१३-१४ साठीची शिक्षक निश्चिती केलेली आहे. या शाळेत इ.१ ते ५ साठी २, इ.६ ते ७ साठी २ पदवीधर शिक्षक अशी एकूण ४ पदे मंजूर आहेत.

वरिष्ठ प्राथमिक शाळेत इ.६ वी ते ८ वी हे तीनही वर्ग असतील तर या वर्गासाठी ३ पदे मंजूर होतात. पैकी एक विज्ञान व गणित विषयासाठी दुसरा समाजशास्त्र विषयासाठी व तिसरा भाषा विषयासाठी असतो.

मठ शाळेची एकूण पटसंख्या ७० असून इ.१ ते ५ ची पटसंख्या ४८ व इ.६ ते ७ वर्गाची पटसंख्या २२ आहे. सदर शाळेतील कार्यरत २ पदवीधर शिक्षकांपैकी १ पदवीधर शिक्षक श्री.दत्ताराम परब हे हृदय शस्त्रक्रिया झाल्याने वैद्यकीय रजेवर होते. त्यामुळे पंचायत राज समितीचे भेटीच्या दिवशी वरच्या वर्गाला एक शिक्षक अध्यापन करताना आढळला.

जिल्हा परिषदेच्या उपलब्ध शिक्षकांपैकीच शिक्षक वरच्या वर्गासाठी अध्यापन करतात. इ.८ वी चा वर्ग जोडल्यानंतर ३ रे पद निर्माण होऊन विज्ञान व गणितासाठी स्वतंत्र शिक्षक मिळू शकेल.

सद्यःस्थितीत जिल्ह्याला मंजूर पदाइतकेच शिक्षक कार्यरत असल्यामुळे भविष्यात नवीन पदे रिक्त झाल्यानंतर नवीन भरती करताना गणित / विज्ञान विषयासाठी स्वतंत्र विज्ञान पदवीधर शिक्षक नेमणे शक्य होणार आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

जिल्हा परिषद शाळांमध्ये तज्ञ शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाचे धोरण स्पष्ट करताना सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण ३२ शिक्षक बी.एस्सी. झालेले आहेत आणि अशीच परिस्थिती संपूर्ण राज्यात आहे. शिक्षक हक्क कायद्याप्रमाणे उच्च माध्यमिक शाळेमध्ये गणित व विज्ञान शिकवण्याकरिता शिक्षक उपलब्ध नाहीत. बहुतेक शिक्षक कला शाखेतून पदवीधर झालेले आहेत, यामुळे सर्व शाळांमध्ये शिक्षक देणे शक्य होत नाही. या शाळांमध्ये हळूहळू शिक्षक देता येतील. ज्या शिक्षकांनी इतिहास हा विषय घेऊन पदवी पूर्ण केली आहे, त्यांना मुक्त विद्यापीठातून विज्ञान किंवा गणित हे विषय घेऊन पदवी घेता येईल, अशी उपाययोजना सूरू केली जात आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

राज्यातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना विशेषतः आठवी, नववी व दहावीच्या वर्गामध्ये विज्ञान शिकवण्यासाठी शिक्षकच नाही. सध्या बऱ्याच जागा रिक्त असून भविष्यात देखील शिक्षकांची पदे रिक्त होतील. सध्या



प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गळती होत आहे. बरीचशी मुले खाजगी शाळांमध्ये जातात. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेच्या बाबत बरीच दुरवस्था आहे. तेथील पटसंख्या कमी आहे. एका तालुक्यातील जवळजवळ ५० ते ६० प्राथमिक शाळा बंद होण्याच्या अवस्थेत आहेत. ही बाब गंभीर असल्याने शिक्षकांबाबतची आकडेवारी समितीस देण्याचे विभागीय सचिवांनी मान्य करुन हा विषय कॅबिनेटच्या बैठकीमध्ये मांडून या संदर्भात शासनाचे धोरण ठरवले जाणार आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्राथमिक वर्गामध्ये ३० मुलांमागे एक शिक्षक व प्रत्येक शाळेमध्ये किमान २ शिक्षक तसेच उच्च माध्यमिक वर्गामध्ये ३५ मुलांमागे एक शिक्षक असणे गरजेचे आहे. आता पर्यंत अनेक ठिकाणी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन केलेले आहे. प्रत्येक शाळेमध्ये किमान दोन शिक्षक असावेत व त्यातील एक शिक्षक विज्ञान शिकवणारा शिक्षक असावा असा उल्लेख शासन निर्णयामध्ये केला जाणार आहे. ३ वर्षात गुणवत्ता सुधारण्यासाठी संबंधित विभागाकडून प्रयत्न केला जाणार आहे, असे नमूद केले.

राज्यातील जिल्हा परिषद शाळांतील शैक्षणिक दर्जाबाबत समितीने चिंता व्यक्त करुन दर्जावाढ करावयाच्या उपाययोजनांबाबत समितीस माहिती देताना, माननीय मुख्यमंत्र्यांनी यात जातीने लक्ष घातले असून संपूर्ण देशामध्ये शैक्षणिक दर्जामध्ये आपले राज्य पहिल्या तीन क्रमांकांमध्ये आणण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे आणि या कार्यक्रमाची संपूर्ण राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय देखील निर्गमित करण्यात आला आहे. शासनाने सर्व प्रथम शिक्षकांना कोणकोणती कामे देण्यात येतात याची माहिती संकलित करण्यासाठी १३० प्रकारची प्रश्नावली तयार करून शाळांकडून माहिती मागवून तीचे विश्लेषण करण्यात आले. मागणी आल्या शिवाय प्रशिक्षण द्यायचे नाही. विद्यार्थ्यांच्या शिकविण्यावर भर द्यावा. माहे जुलै, ऑक्टोबर आणि एप्रिल या महिन्यांमध्ये मुलांच्या चाचण्या होण्यात येणार आहेत तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती चाचणी घेण्यात येणार आहे. ज्या इयत्तेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता ४० टक्क्यांपेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष देवून त्या शाळेचे गुणवत्ता क्रम काढणार आहोत व या कामासाठी उपलब्ध केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी व अधिकारी या सारख्या पर्यवेक्षीय यंत्रणेचा देखील आम्ही उपयोग करून घेणार आहोत. इंटरनेटवर, व्हिडिओ क्लिप, ॲक्टीव्हीटीज उपलब्ध आहेत. तसेच, शैक्षणिक व्हिडिओ क्लिप, साहित्य यांचा प्रसार व्हॉटस् ॲपच्या माध्यातून देखील करता येईल. अशा प्रकारे प्रगत शैक्षणिक राज्याचे नियोजन आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला समितीने भेट दिली असता मौजे मठ, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथील जिल्हा परिषद प्रशालेमध्ये इ.५ वी ते इ.७ वी विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित हा विषय एकच शिक्षक शिकविताना आढळून आला. सदरहू बाबतीत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतल्यानंतर समितीच्या निदर्शनास आले की, संपूर्ण राज्यात तज्ञ शिक्षकांची कमतरता आहे.

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची गळती होत आहे. बरीचशी मुले खाजगी शाळांमध्ये जातात. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांचीही अत्यंत दुरवस्था आहे. तेथील पटसंख्या कमी असल्याने बऱ्याच शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत असे भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले आहे.

**उपरोक्त बाबी संदर्भात समिती खालीलप्रमाणे शिफारस करीत आहे.**

**(१) प्राथमिक शाळांमधील शिक्षक भरतीचे अधिकार जिल्हा परिषदांना आहेत. त्यांचा वापर करुन सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने रिक्त पद भरतीची कार्यवाही एक महिन्याच्या आत करण्याबाबत विभागाने आदेशित करावे.**

**(२) राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांतील विद्यार्थ्यांसाठी तीन राज्यस्तरीय चाचण्यांचे केलेल्या आयोजनानंतर त्याचे त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करुन घेण्यात यावे व अशा शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापन केलेल्या सचिवांच्या कार्याचा आढावा घेण्यात यावा.**

**(३) खाजगी शाळांमधील शिक्षक निवडणुकीसाठी वेळ काढून प्रचार करतात, निवडणुकीत भाग घेतात. त्यामुळे त्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर तसेच शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होऊन त्यांचा शैक्षणिक विकास खुंटतो. अशा राजकारणात भाग घेणाऱ्या शिक्षकांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक प्रचलीत शासन धोरणात बदल करुन त्याअनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करावा.**

**(४) याबाबतीत संपूर्ण राज्यात विज्ञान व गणित शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या किती आहे व शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे किती शिक्षकांची आवश्यकता आहे याचा आढावा घेण्यात यावा व या रिक्त पदांची भरती कालबध्द कार्यक्रम हाती घेवून किती कालावधीत पूर्ण केली जाणार आहे, याबाबतची माहिती शालेय शिक्षण विभागाने समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी.**

**उपरोक्त नमूद केलेल्या शिफारशींच्या अनुषंगांने विभागाने तातडीने कार्यवाही करुन समितीला केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांत पाठवावा.**

**२.४ मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी २० टक्के रकमेपेक्षा कमी खर्च केल्याबाबत :-**

समितीने सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी कुडाळ पंचायत समितीस भेट दिली. भेटीच्या वेळी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी २० टक्के पेक्षा कमी खर्च झालेला असल्याने शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक वर्षी २०% रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्याचे बंधन आहे. समाजकल्याणासाठी रक्कम रुपये ५,५०,०००/- एवढी रक्कम खर्च करणे गरजेचे असताना आपण फक्त रक्कम रुपये २,४५,१६६/- एवढीच रक्कम खर्च केली आहे. २० टक्के रक्कम खर्च करणे बंधनकारक आहे असे समितीने मत प्रतिपादन केले.

**समितीने साक्षीच्या वेळी गट विकास अधिकारी यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.**

शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक वर्षी २०% रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्याचे बंधन आहे. समाजकल्याणासाठी रक्कम रुपये ५,५०,००० एवढी रक्कम खर्च करणे गरजेचे असताना आपण फक्त रक्कम रुपये २,४५,१६६ एवढीच रक्कम खर्च केली आहे. उर्वरित रक्कम खर्च न करण्याचे कारणे काय, शासन निर्णयाची अंमलबजावणी का करण्यात आली नाही.



**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती सेस अनुदानातून मागासवर्गीय उन्नतीसाठी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकामध्ये एकूण ५,५०,००० इतकी तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात पंचायत समितीला प्राप्त झालेल्या रकमेमधून मागील अनुशेषासह खर्च करावयाची रक्कम रुपये ५,००,०६९ इतकी होती. त्यामधून १० कामे मंजूर केलेली होती. त्यापैकी २ कामे पूर्ण करून त्यावर एकूण रक्कम रु.२,४५,१६६ इतका खर्च सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात करण्यात आलेला आहे. उर्वरित कामे मुदतीत पूर्ण न झाल्याने सदर आर्थिक वर्षात खर्च होवू शकलेला नाही.

मार्च, २०११ अखेर रक्कम रुपये २,५४,९०३ अनुशेष शिल्लक होता व सन २०११-२०१२ मध्ये करावयाचा २०% खर्च रक्कम रुपये ३,५४,९४२ अशी एकूण एकंदर ६,०९,८४५ इतका खर्च करावयाचा होता. त्यापैकी पुढील ३ कामांवर रक्कम रुपये १,२८,९९८ इतका खर्च करण्यात आला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

(१) आवळेगाव चव्हाणवाडी पायवाट काँक्रीटीकरण करणे रक्कम रु.४०,०००.

(२) आवळेगाव चव्हाणवाडी रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधणे रक्कम रु.४०,०००.

(३) कसाल हरिजनवाडी रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधणे रक्कम रु.४८,९९८.

तसेच मागासवर्गीयांच्या घरदुरुस्तीसाठी प्रत्येकी १०,०००/- प्रमाणे २५ लाभार्थ्यांना रक्कम रु.२,५०,००० इतका खर्च करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे एकूण रक्कम रु.३,७८,९९८/- खर्च करण्यात आलेला असून रु.२,३०,८४७ अनुशेष शिल्लक आहे. सन २०११-१२ मधील अनुशेष रक्कम रु.२,३०,८४७ व सन २०१२-२०१३ मध्ये करावयाचा खर्च रु.४,४५,००० अशी एकूण रक्कम रु.६,७५,८४७ इतकी रक्कम अनुशेषासह खर्च करावयाची होती. त्यापैकी खालील नमूद कामे हाती घेण्यात आलेली होती. कालेली चव्हाणवाडी विहिर दुरुस्ती करणे रक्कम रु.४६,५०६ इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच मागासवर्गीय २६१ लाभार्थ्यांना सौर कंदील पुरवठा करण्यात आला असून त्यावर रक्कम रु.६,२८,४८८ एवढा खर्च करण्यात आला आहे. अशाप्रकारे एकूण एकंदर रक्कम रु.६,७४,९९४ एवढा मागासवर्गीय उन्नतीसाठी खर्च करण्यात आलेला आहे. म्हणजचे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात मागील अनुशेषासह खर्च १००% करण्यात आलेला आहे.

**समितीस शासनाकडून उपरोक्त मुद्यांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, कुडाळ यांस सेस अनुदानातून मागासवर्गीय उन्नतीसाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकाप्रमाणे एकूण रक्कम रु.५,५०,००० इतकी तरतूद करणेत आली होती. परंतु प्रत्यक्षात पंचायत समितीला प्राप्त झालेल्या रकमेमधून मागील अनुशेषासह खर्च करावयाची रक्कम रु.५,००,०६९ इतकी होती. त्यामधून १० कामे पंचायत समितीने मंजूर केली. त्यापैकी ०२ कामे पूर्ण करून त्यावर एकूण रक्कम रु.२,४५,१६६ इतका खर्च सन २०१०-११ या आर्थिक वर्षात करणेत आलेला आहे. उर्वरित कामे मुदतीत पूर्ण न झाल्याने सदर आर्थिक वर्षात खर्च होवू शकलेला नाही. तथापि, शिल्लक अनुशेषासह सोबत जोडलेल्या परिशिष्ठाप्रमाणे शासन निर्णयानुसार पंचायत समितीने तरतूद करून सन २०१४-१५ अखेर १००% खर्च केलेला आहे.

**मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी पंचायत समिती, कुडाळ उत्पन्नाच्या २०% खर्चाबाबतची माहिती**
**(सन २०१०-११ ते २०१४-१५)**

| अ.क्र. | वर्ष | मागील अनुशेष | पं.स.चे प्रत्यक्ष उत्पन्न | २०% प्रमाणे येणारी रक्कम | मागील अनुशेषासह खर्च करावयाची रक्कम | प्रत्यक्ष खर्च केलेली रक्कम | शिल्लक अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१०-११ . . | १५४९२९ | १७२५७०० | ३४५१४० | ५०००६९ | २४५१६६ | २५४९०३ |
| २ | २०११-१२ . . | २५४९०३ | १७७४७१४ | ३५४९४२ | ६०९८४५ | ३७८९९८ | २३०८४७ |
| ३ | २०१२-१३ . . | २३०८४७ | २२२०३६६ | ४४५००० | ६७५८४७ | ६७५००८ | ९९२ |
| ४ | २०१३-१४ . . | ९९२ | ४४२०००० | ८८४००० | ८८४९९२ | ८८०००० | १०००० |
| ५ | २०१४-१५ . . | १०००० | १६०२७६० | ३२०५५२ | ३३०५५२ | ९६९२४६ | निरंक |

**विभागीय सचिवांची साक्ष :**

समितीने साक्षीच्या वेळी हा प्रश्न प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये अनुभवास येतो. समाजकल्याण विभागाचे पैसे सर्वच जिल्ह्यांमध्ये अखर्चित राहण्याचे कारण काय आहे, मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवरील खर्च हा त्याच आर्थिक वर्षात झाला पाहिजे. या समितीच्या म्हणण्यावर, मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेला निधी किती वर्षात खर्च करावयाचा याचा शासन अभ्यास करीत आहे. सर्वसाधारणपणे निधी मिळाल्यानंतर तो पुढील आर्थिक वर्षामध्ये खर्च करणे शक्य होते. कारण सगळी प्रक्रिया ही माहे डिसेंबर नंतरच सुरू होते. हा सर्व निधी पंचायत समितीच्या अंतर्गतच असतो. त्यास पदाधिकाऱ्यांची मान्यता आवश्यक असते असा विभागीय सचिवांनी समितीसमोर खुलासा केला.

**अभिप्राय व शिफारशी :-**

राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक वर्षी २० टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि, सदर निधी खर्च होण्यास ४ वर्षाचा कालावधी लागणे ही गंभीर बाब आहे. कारण ज्या आर्थिक वर्षासाठी निधी मंजूर झालेला असता तो त्याच आर्थिक वर्षात खर्च होणे आवश्यक असते व तो न झाल्यास त्या मागासवर्गीय लाभार्थ्यांवर अन्याय केल्यासारखे होईल. याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे असे समितीचे मत झाले आहे.

या संदर्भात समितीच्या निदर्शनास आले की, कमी अधिक प्रमाणात संपूर्ण राज्यातील जिल्हा परिषदा त्या त्या आर्थिक वर्षात मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी निधी खर्च करीत नाहीत. **ज्या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करून दिलेला आहे. त्याच आर्थिक वर्षात तो खर्च करणे आवश्यक आहे व तो अखर्चित राहिल्यास त्याबाबतची कारणमिमांसा संयुक्तीक असणे गरजेचे आहे अशाप्रकारचे कडक स्वरुपाचे परिपत्रक ग्रामविकास विभागाने एक महिन्याच्या आत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट " अ "

## शासनाचे आदेश व परिपत्रक

निराधार, परित्यक्ता व विधवांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदानाबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१२/प्र.क्र.२२०/का-२**

नवीन प्रशासकीय इमारत, ३रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १५ फेब्रुवारी, २०१४

वाचा —

१) **महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.८१/२००१/मविधो-२०००/प्र.क्र.४२९/का-२, दि.२५.५.२००१.**

२) **महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.९३/का-२, दि.३०.९.२०११.**

प्रस्तावना —

शासन निर्णय दिनांक २५.५.२००१ मधील योजना क्र.३ निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदान या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान रु.२०००/- वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वकष विचार करुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय—**

शासन निर्णय, दिनांक २५.५.२००१ मधील योजना क्र.३ निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदान ही योजना रद्द करुन, शासन निर्णय दिनांक ३०.९.२०११ अन्वये कार्यान्वित शुभमंगल सामुदायिक विवाह योजनेची व्याप्ती वाढवून, ती केवळ शेतकरी / शेतमजूर यांच्यासाठी न ठेवता, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागासप्रवर्ग वगळता अन्य प्रवर्गातील रुपये एक लक्षपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार / परित्यक्ता आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहाकरीता शासन निर्णय दिनांक ३०.९.२०११ मधील



इतर अटी / शर्तीनुसार मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेची अंमलबजावणी दिनांक १.१.२०१४ पासून करण्यात येईल.

२. वरील योजना पूर्णत: जिल्हा नियोजन समितीमार्फत राबविण्यात यावी व त्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेत दरवर्षी तरतूद करुन जिल्हा नियोजन समितीस निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. या योजनेसाठी निधी जिल्हा नियोजन समितीस उपलब्ध करुन दिलेलया निधीतूनच भागविण्यात यावा. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये शुभमंगल सामुदायिक विवाह / नोंदणीकृत विवाह योजना या योजनेसाठी जिल्हास्तरीय कार्यान्वयन यंत्रणेच्या मागणीनुसार पुनर्विनियोजनाने जादा निधी देण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्या सचिव, जिल्हा नियोजन समिती यांना नियोजन विभागामार्फत कळविण्यात येईल.

३. सदर आदेश नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.इटीएस/१४८१, दिनांक ३०.९.२०१३ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९४/१३/व्यय-६, दिनांक २०.२.२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने आणि मंत्रीमंडळाने दिनांक २९.१.२०१४ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२१५१५४७१७०४३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahendra
Babusing
Hajari

Digitally signed by Mahendra Babusing Hajari
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Women & Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Mahendra Babusing Hajari
Date: 2014.03.01 16:32:53 +05'30'

(म.बा. हजारी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.

५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई.
१०. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त,
१२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, वांद्रे, मुंबई.
१५. सचिव, बालहक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
१६. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, वांद्रे, मुंबई.
१७. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह)
१९. महासंचालक, कै.वसंतराव नाईक कृषी स्वावलंबन मिशन, अमरावती.
२०. सर्व आयुक्त, महानगरपालिका / नगरपालिका,
२१. महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), १/२, मुंबई / नागपूर.
२२. ग्रथांलय, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२३. सर्व जिल्हाधिकारी,
२४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२५. सर्व विभागीय आयुक्त, महिला व बाल विकास,
२६. सर्व जिल्हा विवाह नोंदणी निबंधक,
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / ठाणे.
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
३०. निवड नस्ती, का-२



# परिशिष्ट “ ब ”

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक ०८ जानेवारी, २०१४**

**स्थळ : जिल्हा परिषद, गोंदिया**

**उपस्थिती**

१. श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री. विजयराव खडसे, वि.स.स.
५. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
६. श्री. ठ्ठ्ठसाहेठु पाटील, वि.स.स.
७. श्री. संजय भेगडे, वि.स.स.
८. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
९. श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
१०. श्री. संजय राठोड, वि.स.स.
११. श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१२. ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
१३. श्री. राजाराम ओझरे, वि.स.स
१४. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
१५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

१६. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
१७. श्री. दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री. ना. रा. थिटे, अवर सचिव.

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. श्रावण पाटील, कक्ष अधिकारी

**स्थानिक लेखा निधी संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

(शा.म.मु.) एचबी ११७६—४ (७००—७-२०१५)



**जिल्हा परिषद, गोंदिया**

(१) श्री. ज्ञा. द. शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. सचिन साबळे, अति. मु.का.अ.(अ.का.)
(३) श्री. आर. आर. पराते, प्रकल्प संचालक(जिग्राविय)(अ.का.)
(४) श्री. दि. वा. जाधव, मु.ले.वि.अ.(अ.का.)
(५) श्री. उ. ना. वाकोडीकर, उप मु.का.अ.(सामान्य) (अ.का.) (ल.पा.)
(६) श्री. स. चो. साबळे, उप मु.का.अ.(बाक)
(७) श्री. व्ही. एल. राठोड, उप मु.का.अ.(पंचायत)
(८) डॉ. एस. एस. कळमकर, जिल्हा आरोग्य अधिकारी
(९) कु. वंदना शिंदे, कृषी विकास अधिकारी
(१०) डॉ. म. पु. मल, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (अ.का.)
(११) श्री. ध. न. पाटील, शिक्षणाधिकारी (प्रा.)
(१२) श्री. शरद खंडागळे, शिक्षणाधिकारी (मा.)
(१३) श्री. पी. डी. लोखंडे, कार्यकारी अभियंता (सा.बां.)
(१४) श्री. उ. ना. वाकोडीकर, का.अ.(ल.पा.)
(१५) श्रीमती एन.एस.अंसारी, का.अ.,प्र.मंग्रासयो
(१६) श्री. विनोद उध्दरवार, का.अ.(प्र.)
(१७) श्री. एल. एम. मोहबंसी, ग.शि.अ.,पं.स.गोंदिया
(१८) श्री. आर. एन. मेश्राम, तत्कालिन उप शिक्षणाधिकारी (प्राथ.)
(१९) श्री. एस. एस. कटरे, तत्कालिन प्रभारी का.अ.
(२०) डॉ. बी. के. मेश्राम, माजी जिल्हा आरोग्य अधिकारी
(२१) श्री. स. क. वालकर, ग.वि.अ.,गोंदिया
(२२) श्री. शा. ना. मेश्राम, ग.वि.अ.,देवरी
(२३) श्री. हे. ब. शहारे, ग.वि.अ.,गोरेगाव
(२४) श्री. रा. ज. धांडे, ग.वि.अ.,सडक अर्जुनी
(२५) श्री. गो. धा. कोरडे, ग.वि.अ.,अर्जुनी/मोर
(२६) श्री. सु. न. पांडे, ग.वि.अ.,तिरोडा
(२७) श्री. रा. लो. पुराम, ग.वि.अ.,आमगाव
(२८) श्री. वि. उ. पचारे, ग.वि.अ.,सालेकसा
(२९) श्री. प्रदिप गोगुलवार, सेवानिवृत्त ग.वि.अ.,गोंदिया

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यातील गोंदिया जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ०९ जानेवारी २०१४**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, गोंदिया**

**उपस्थिती**

१. श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री. विजयराव खडसे, वि.स.स.
५. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
६. श्री. बाबासाहेब पाटील, वि.स.स.
७. श्री. संजय भेगडे, वि.स.स.
८. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
९. श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
१०. श्री. संजय राठोड, वि.स.स.
११. श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१२. श्री. राजाराम ओझरे, वि.स.स
१३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
१४. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

१५. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
१६. श्री. दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी,
श्री. ना. रा. थिटे, अवर सचिव.

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. श्रावण पाटील, कक्ष अधिकारी.





**जिल्हा परिषद, गोंदिया**

(१) श्री. ज्ञा. द. शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. सचिन साबळे, अति. मु.का.अ.(अ.का.) (बा.क.)
(३) श्री. आर. आर. पराते, प्रकल्प संचालक(जिग्राविचं)(अ.का.)
(४) श्री. दि. वा.जाधव, मु.ले.वि.अ.(अ.का.)
(५) श्री. उ.ना. वाकोडीकर, उप मु.का.अ.(सामान्य) (अ.का.) (ल.पा.)
(६) श्री. व्ही. एल.राठोड, उप मु.का.अ.(पंचायत)
(७) डॉ. एस. एस. कळमकर, जिल्हा आरोग्य अधिकारी
(८) कु. वंदना शिंदे, कृषी विकास अधिकारी
(९) डॉ. म. पु. मल, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (अ.का.)
(१०) श्री. ध. न. पाटील, शिक्षणाधिकारी (प्रा.)
(११) श्री. शरद खंडागळे, शिक्षणाधिकारी (मा.)
(१२) श्री. पी. डी. लोखंडे, कार्यकारी अभियंता (सा.बां.)
(१३) श्रीमती एन.एस.अंसारी, का.अ.,प्र.मंग्रासयो
(१४) श्री. जीवनेश मिश्रा, का.अ.(सर्व शिक्षा अभियान)
(१५) श्री. विनोद उध्दरवार, का.अ.(प्र.) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
(१६) कु. वैशाली खोब्रागडे, विस्तार अधिकारी
(१७) श्रीमती वनिता सावंत, लेखाधिकारी, वित्त
व इतर संबंधित अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील गोंदिया जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०१४**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सिंधुदुर्ग**

**उपस्थिती**

(१) श्री. जयप्रकाश दांडेगांवकर, वि.स.स.तथा समिती प्रमुख
(२) श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
(३) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(४) श्री. दिलीप माने, वि.स.स.
(५) श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.
(६) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
(७) श्री. सूर्यकांत दळवी, वि.स.स.
(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(९) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

(१०) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. गं. दु. कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री. ना. रा. थिटे, अवर सचिव.

**जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग**

(१) श्री. दिलीप पांढरपट्टे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. सुनिल रेडकर, प्र.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. सोमनाथ रसाळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(४) श्री. रत्नाकर धाकोरकर, शिक्षणाधिकारी (प्राथ.)
(५) श्री. सुशिलकुमार नाशिककर, प्र.कार्यकारी अभियंता (बांध.)
(६) श्री. अनिल भ.भालेराव, कार्यकारी अभियंता (ल.पा.)
(७) डॉ. महेश खलिपे, जिल्हा आरोग्य अधिकारी
(८) श्री. सत्यनारायण चंदेल, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.



**शनिवार, दिनांक १९ जुलै, २०१४**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सिंधुदुर्ग**

**उपस्थिती :**

(१) श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
(३) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(४) श्री. अण्णा बनसोडे, वि.स.स.
(५) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(७) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

(८) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. गं. दु. कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री. ना. रा. थिटे, अवर सचिव.

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. दि. ग. मोरे, सह सचिव

**जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग**

(१) श्री. दिलीप पांढरपट्टे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. सुनिल रेडकर, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. संतोष धोत्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
(४) श्री. मारुती कांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(५) श्री. सोमनाथ रसाळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
(६) श्री. रत्नाकर धाकोरकर, शिक्षणाधिकारी (प्रा.)

(७) श्री. देवीदास कुळाल, शिक्षणाधिकारी (माध्य.)
(८) श्री. सुनिलकुमार नाशिककर, प्र.कार्यकारी अभियंता (बांध.)
(९) श्री. अनिल भालेराव, कार्यकारी अभियंता (ल.पा.)
(१०) श्री. श्रीकृष्ण होशिंग, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)
(११) डॉ. महेश खलिपे, जिल्हा आरोग्य अधिकारी
(१२) श्री. सिध्दाण्णा म्हेत्रे, कृषी विकास अधिकारी
(१३) श्री. सत्यनारायण चंदेल, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१४) श्री. संतोष भोसले, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
(१५) डॉ. शिवाजी थोरात, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूसवियं, सिंधुदुर्ग
(१६) डॉ. एन. व्ही. सोडल, अति.जिल्हा आरोग्य अधिकारी
(१७) श्री. एन. बी. भोई, कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु., कोल्हापूर
(१८) श्री. ए. वाय. जाधव, अति. मु.का.अ. (सेवानिवृत्त)
(१९) श्री. ए. डी. कांबळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (तत्कालीन)
(२०) डॉ. रमेश कुलकर्णी, अति.जिल्हा आरोग्य अधिकारी (सेवानिवृत्त)
(२१) श्री. प्रशांत चव्हाण, गट विकास अधिकारी (प्रभारी), दोडामार्ग
(२२) श्री. शरद महाजन, गट विकास अधिकारी, सावंतवाडी
(२३) श्री. तुकाराम जाधव, गट विकास अधिकारी (प्रभारी), वेंगुर्ला
(२४) श्री. वासुदेव नाईक, गट विकास अधिकारी (प्रभारी), कुडाळ
(२५) श्री. राजेंद्र पराडकर, गट विकास अधिकारी (प्रभारी), मालवण
(२६) श्री. चंद्रसेन मकेश्वर, गट विकास अधिकारी, कणकवली
(२७) श्री. मिलिंद्र जाधव, गट विकास अधिकारी (प्रभारी), वैभववाडी
(२८) श्री. विजय चव्हाण, गट विकास अधिकारी, देवगड

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.



**गुरुवार, दिनांक २६ जून, २०१४**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. विजयराव खडसे, वि.स.स.
(३) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(४) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
(५) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित**

(७) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री. गं. दु. कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

**स्थानिक लेखा निधी संचालनालय**

श्री. का. मा. विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

डॉ. एस. के. गोयल, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग
श्री. एस. एस. संधु, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग
श्री. दि. ग. मोरे, सहसचिव, ग्रामविकास विभाग
श्री. प्रकाश ठुहे. सहसचिव, शालेय शिक्षण विभाग
डॉ. नरेश गिते, उप सचिव, ग्रामविकास विभाग
श्री. गोपीनाथ आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग
श्री. ज्ञा. द. शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल आणि सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल या संदर्भात गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ०२ जुलै, २०१४**
**स्थळ : विधान भवन, मबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(३) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(४) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
(५) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(६) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(७) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

(८) श्री.सुरेश हळवणकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. गं. दु. कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री. ना. रा थिटे, अवर सचिव

**स्थानिक लेखा निधी संचालनालय**

श्री .का. मा. विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री. एस. एस. संधु, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग
श्री. आर. डी.शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग
डॉ. नरेश गिते, उप सचिव, ग्रामविकास विभाग
श्री. डी. डी. शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
श्री. सु. सं. धांडे, मुख्य अभियंता, महावितरण कंपनी, मुख्य कार्यालय, मुंबई

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल या संदर्भात गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया, मुख्य अभियंता, महावितरण कंपनी, मुख्य कार्यालय, मुंबई यांची साक्ष घेतली.



**मंगळवार, दिनांक १६ जून, २०१५**
**स्थळ : विधान भवन, मबई**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
३. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
४. श्री. समीर कुणावार, वि.स.स
५. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
६. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
७. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
८. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
९. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१०. श्री. अमित झनक, वि.स.स.
११. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
१२. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
१३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
१४. ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.
१५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. ना. रा. थिटे, अवर सचिव.

**स्थानिक लेखा निधी संचालनालय**

श्री. एस. के. विधाते, संचालक,

**विभागीय प्रतिनिधी**

श्रीमती मेधा गाडगीळ, अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय.
श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय.

श्री. उज्ज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय
श्री. संजय कुमार, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय
श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, वित्त (सुधारणा) विभाग, मंत्रालय
श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय
श्री. प्रभाकर देशमुख, सचिव, रोहयो, मंत्रालय
श्री. राजगोपाल देवरा, सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय
श्री. शरद सबनीस, सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग
श्री. वि. ज. सुरळकर, संचालक, विमा संचालनालय
श्री. अरविंदकुमार झा, प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग
श्री. भगवान, अपर प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग
डॉ. सतीश पवार, संचालक, आरोग्य संचालनालय
श्री. दिलीप पांढरपटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा
श्री. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.
श्री. सु.बा.साळोखे, का.अ.जि.प. सिंधुदुर्ग.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, प्रधान सचिव, वित्त (सुधारणा) विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, रोजगार हमी योजना विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, संचालक, विमा संचालनालय, मुंबई, प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग, संचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांची साक्ष घेतली.



**बुधवार, दिनांक ०१ जुलै २०१५**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
१. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
२. श्री. आर. टी. देशमुख्, वि.स.स.
३. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
४. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
५. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
६. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
७. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
८. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
९. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१०. श्री. अमित झनक, वि.स.स.
११. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१२. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
१३. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
१४. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

**विभागीय प्रतिनिधी**

श्री. उज्ज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग
श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग
श्री. नंदकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
श्री. विवेक नाईक, सचिव, (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग
श्री. शेखर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
श्री. सुनील रेडकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) व (सा. प्र.), जि. प., सिंधुदुर्ग.
श्री. महावीर माने, शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

२००९-२०१० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांची साक्ष घेतली.



**शुक्रवार, दिनांक २४ जुलै २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
५. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
६. श्री. राजेंद्र नजरधाने, वि.स.स.
७. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
८. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
९. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१०. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
११. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
१३. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
१४. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत दुसऱ्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून ते किरकोळ सुधारणासह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई